प्रेस नोट १९ दिनांक ०४/१०/२०२४

# फसवणुकीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या खेळण्यातील नोटा व बनावट सोने शिवाजीनगर पोलीसांनी जप्त केलेबाबत...

दिनांक ०३/१०/२०२४ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत एका इसमाकडे खेळण्यातील बनावट नोटा, सोन्यासारखी दिसणारी नकली बिस्कीटे आहेत व त्याचा वापर सदर इसम हा फसवणुकीकरीता वापर करीतस असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

सदरची माहिती मिळालेवरून वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पोलीस ठाणे यांनी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची नेमणूक करून मिळालेल्या माहितीच्या आधारे छापा मारला असता सदर ठिकाणी नफीस अब्दुल रौफ खान हा इसम मिळून आला. त्याचे राहते घराची झडती घेतली असता खालील नमुद प्रमाणे खोटा मुद्देमाल मिळाला असून तो पंचनाम्याअंतर्गत जप्त करण्यात आला आहे.

रू. ५०० दराचे १०० नोटांचा एक बंडल असे एकुण ६५० बंडल त्यावर भारतीय बच्चो की बँक व इंग्रजीमध्ये FULL OF FUN असे लिहीलेले, रू. २००० दराचे १०० नोटाचा एक बंडल असे एकुण ८५ बंडल त्यावर भारतीय बच्चो की बँक व इंग्रजीमध्ये FULL OF FUN असे लिहीलेले, सोन्यासारखे दिसणारे नकली १४ बिस्कीटे त्यावर १०० ग्रॅम वजन असे लिहीलेले, एक बेडी, रू. २०००/- दराचे ७ जुन्या भारतीय चलनाच्या नोटा व रू. ५०० दराच्या भारतीय चलनाच्या २५ नोटा असे एकुण २६,५००/- रूपये, एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

नफीस अब्दुल रौफ खान याचेविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाणेमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सपोनि विलास नवले करीत आहेत. सदर आरोपीत हा सराईत गुन्हेगार असून तो भारतीय चलनातील एक खरी नोट ही भारतीय बच्चो की बँक व इंग्रजीमध्ये FULL OF FUN असे लिहीलेल्या बंडलवर वापरून दिशाभूल करून लोकांची फसवणूक करतो. त्याबाबत त्याचेवर यापूर्वी पनवेल, नौपाडा, सुरत व अर्नाळा पोलीस ठाणेमध्ये फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत.

सदर उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, श्री. सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, डॉ. श्री. महेश पाटील, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, श्री. हेमराजसिंह राजपूत, सहायक पोलीस आयुक्त, देवनार विभाग, श्री. संजय डहाके यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे श्री बापूराव देशमुख, पोनि जब्बार तांबोळी, सपोनि विलास नवले, सपोनि भारत जाधव, पोह मोरे, मगरे, पोशि कारंडे, घारे, मोरे व मपोशि शिरवले यांनी केली आहे.

------------------